अत्याधुनिक फर्निचर व गिफ्ट आर्टिकल्स चे सर्वांग सुंदर दालन
श्री ॲम्बीयन्स फर्निचर ॲन्ड इंटेरियर मॉल
■ सोफा सेट ■ डायनिंग टेबल ■ बेडरुम सेट ■ ऑफिस फर्निचर ■ स्टिल अलमारी ■ टि टेबल, मंदिर ■ गिफ्ट आर्टिकल्स
एकनाथपुरम, शंकर नगर, अमरावती Ph.0721-2677002

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

अमृत ७५ महोत्सव १९५०-२०२४

BIGGEST AIR CONDITIONER MALL
JAPAN BRAND 1.5 TON AC ₹26499/- ONWARDS
मॉडर्न इलेक्ट्रॉनिक मॉल
RUKHMINI NAGAR 86000 500 15

■ वर्ष ७५ वे/अंक २४५ वा ■ ■ अमरावती,गुरुवार,दिनांक २४ एप्रिल २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ www.dainikhindusthan.com marathe_vinod1@rediffmail.com ■ भारतीय सौर १० वैशाख १९४७ ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.०० ■

## पहलगाम हल्ल्यानंतर भारताचे पाकिस्तान विरोधात सर्वात कठोर पावलं

### सिंधू जल करार रद्द, व्हिसा बंद; मोदींच्या बैठकीतून पाकवर स्ट्राईक



नवी दिल्ली दि. २३ : जम्मू-काश्मीरच्या पहलगामा येथे झालेल्या हल्ल्यानंतर केंद्र सरकारने कठोर पावलं उचलली आहेत. या हल्ल्यानंतर आज अतिशय मोठ्या घडामोडी घडल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दिल्लीतील निवासस्थानी सीसीएस म्हणजेच कॅबिनेट सुरक्षा समितीची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर उपस्थित उपस्थित होते. ही बैठक जवळपास ३ तास सुरु होती. या बैठकीनंतर परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत महत्त्वाची माहिती देण्यात आली. या हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात असल्याचं स्पष्ट झालं आहे. त्यामुळे सीसीएसच्या बैठकीत पाकिस्तान विरोधात कठोर पावलं उचलण्यात आल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाकडून देण्यात आली आहे.

भारताने आता पाकिस्तानी नागरिकांना भारतात येण्यासाठी व्हिसा कायमचा बंद केला आहे. तसेच जे पाकिस्तानी नागरिक सध्या भारतात आहेत त्यांनादेखील पुढच्या ४८ तासांत देश सोडून जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच भारताने अटारी-वाघा बॉर्डर बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. अटारी-वाघा बॉर्डर १ मे पर्यंत बंद राहणार असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे.

केंद्र सरकारने सिंधू जल करार देखील रद्द करण्याचा निर्णय *(उर्वरित पान २ वर)*

## पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार 'सैफुल्लाह'

श्रीनगर दि. २३ : जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे मंगळवारी (२२ एप्रिल) झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण काश्मीरमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या हल्ल्यात दहशतवाद्यांनी पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार करून २५ जणांचा बळी घेतला. सद्यस्थितीत जम्मू-काश्मीर पोलीस, गुप्तचर यंत्रणा आणि संरक्षण दलाकडून या दहशतवाद्यांचा शोध घेतला जात आहे.



या हल्ल्याचे रेखाचित्र व छायाचित्र सुरक्षा यंत्रणांकडून जारी करण्यात आले असून तिघा दहशतवाद्यांची ओळख पटली आहे. त्यांची नावे आसिफ फौजी, सुलेमान शाह आणि अबू तल्हा अशी असून, चौथ्या दहशतवाद्याची ओळख अद्याप स्पष्ट झालेली नाही. काही माध्यमांनी या चौथ्या दहशतवाद्याचे नाव अबू मूसा असल्याचा दावा केला आहे, मात्र याला अद्याप शासकीय पातळीवरून दुजोरा मिळालेला नाही.दरम्यान, या भीषण *(उर्वरित पान २ वर)*

## पहलगाम हल्ल्यामुळे काश्मीर खोऱ्याची अर्थव्यवस्था ढासळणार

नवी दिल्ली दि. २३ : जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये नुकत्याच झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर, उन्हाळ्यात काश्मीरला भेट देण्याचे स्वप्न पाहणारे हजारो पर्यटक आता त्यांचे प्रवासाचे नियोजन रद्द करत आहेत. या हल्ल्यानंतर खोऱ्यातील सुरक्षेची चिंता पुन्हा एकदा वाढली आहे. काश्मीरचे बुकिंग झपाट्याने रद्द होत आहे. श्रीनगर आणि गुलमर्गला जाणारे सुमारे ३० ते ४० टक्के पर्यटक आता त्यांच्या ठिकाणात बदल करण्याची मागणी करत असल्याची माहिती देशांतर्गत टूर ऑपरेटर्सने दिली आहे.

टूर ऑपरेटर्सच्या म्हणण्यानुसार, काश्मीर ट्रिप रद्द करण्याच्या विनंत्या केवळ २४ तासांत सुमारे २५ टक्क्यांनी वाढल्या आहेत. *(पान २ वर)*

## पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा दल ॲक्शन मोडमध्ये, १५०० हून अधिक जणांना घेतलं ताब्यात

श्रीनगर दि. २३ : जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा दलांनी कारवाईला सुरुवात केली आहे. सुरक्षा दलांनी खोऱ्यातून १५०० हून अधिक लोकांना ताब्यात घेतले आहे. यामध्ये ओव्हर ग्राउंड वर्कर्स किंवा दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असलेल्या लोकांचा समावेश आहे. पहलगाममध्ये काल दहशतवादी हल्ला झाला होता. यामध्ये २८ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे, तर अनेतजण जखमी झाले आहेत.

दरम्यान, जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर या भागातील सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. हल्ल्यानंतर सीमावर्ती राज्य पंजाबनेही सुरक्षा वाढवली आहे. या दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज (२३ एप्रिल २०२५) घटनास्थळी भेट दिली. घनदाट पाइनच्या जंगलांनी वेढलेल्या लोकप्रिय पर्यटन स्थळी दहशतवादी ज्या मार्गाने पोहोचले असावेत, त्या घटनांचाक्रम *(पान २ वर)*

## सर्जिकल स्ट्राईकपेक्षा मोठा हल्ला; अजित डोवाल कामाला लागले, पाकिस्तानवर मोठी कारवाई होणार?

नवी दिल्ली दि. २३ : पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील संबंधी आणखी बिघडले आहेत. या हल्ल्यानंतर आता पाकिस्तानलाभारताकडून हल्ल्या होण्याची भीती सतावत आहे. ही भीती रास्त आहे, कारण जेव्हा पुलवामा हल्ला झाला, तेव्हाही भारताने तात्काळ पाकवर हवाई हल्ला केला होता. त्यामुळेच आता पाकिस्तान घाबरलेल्या स्थितीत आहे. विशेष म्हणजे, या हल्ल्यानंतर आता एनएसए अजित डोभाल कामाला लागले आहेत.



अजित डोवाल एका नवीन रणनीतीअंतर्गत पाकिस्तानला प्रत्युत्तर देण्याची तयारी करत आहेत. २०१४ मध्ये एका विद्यापीठात दिलेल्या भाषणादरम्यान अजित डोवाल यांनी पाकिस्तानविरुद्ध 'बचावात्मक हल्ल्याची' रणनीती स्पष्ट केली होती. त्यांचा असा विश्वास होता की, भारताचा आतापर्यंतचा दृष्टिकोन प्रामुख्याने बचावात्मक राहिला आहे, ज्यामध्ये आपण फक्त पाकिस्तानच्या कृतींना प्रत्युत्तर देतो. या रणनीतीमध्ये भारताला नेहमीच नुकसान सहन करावे लागते.

पाकिस्तानने 'मुंबई' केली, तर त्यांनी 'बलुचिस्तान' गमावण्यास तयार असले पाहिजे, असे डोभाल म्हणाले होते. त्यांचा संदेश असा होता की, भारताने आता केवळ बचावात्मक राहण्याऐवजी पाकिस्तानच्या अंतर्गत कमकुवतपणावर हल्ला करावा. यामध्ये आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर पाकिस्तानच्या दहशतवादी नेटवर्कचा पर्दाफाश करणेदेखील समाविष्ट आहे. तसेच, अफगाणिस्तानच्या माध्यमातूनही पाकिस्तानवर नियंत्रण ठेवले पाहिजे.

आता कालच्या पहलगाम हल्ल्यानंतर डोवाल यांनी या रणनीतीअंतर्गत पाकिस्तानला वेगळे करण्याची योजना आखल्याचे मानले जाते. असेही म्हटले जात आहे की, पाकिस्तान प्रत्युत्तर देण्याची हीच योग्य वेळ आहे. कारण यावेळी तिथले लोकही पाकिस्तानी सैन्यावर खूप संतापले आहेत. पाकिस्तानमध्ये सर्वत्र सरकारविरुद्ध खूप गदारोळ सुरू आहे.

भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावरही अनेक देशांचा पाठिंबा आहे. पाकिस्तानचा आवडता चीन देखील भारतासोबतचे संबंध सुधारण्याचा *(पान २ वर)*


## काश्मीरमध्ये अडकलेल्या सर्व पर्यटकांना आणण्यासाठी विशेष विमानाची व्यवस्था

मुंबई दि. २३ जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला आहे. यामध्ये २८ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ६ जणांचा समावेश आहे. दरम्यान, काश्मीरच्या टूरवर गेलेले अनेक पर्यटक सध्या तिथे अडकले आहेत. याबाबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्वाची माहिती दिली आहे. काश्मीरमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील सर्व पर्यटकांना परत आणण्यासाठी विशेष विमानाची व्यवस्था करणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. याचा सर्व खर्च राज्य सरकार करणार आहे.

जम्मू काश्मीरमधील पहलगाम इथे काल (२२ एप्रिल) पर्यटकांवर दहशतवादी हल्ला झाल्याची घटना घडली आहे. यामध्ये २८ जणांचा मृत्यू झालाय. या हल्ल्यात महाराष्ट्रातील एकूण ६ पर्यटकांचा मृत्यू झालाय. यात डोंबिवलीच्या तिघांचा समावेश आहे. तर पुण्यातील दोन आणि पनवेलच्या एका पर्यटकाचा मृत्यू झालाय. डोंबिवलीचे अतुल मोने, संजय लेले आणि हेमंत जोशी यांचा या दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झालाय. पुण्यातील संतोष जगदाळे आणि कौस्तुभ गणबोटे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झालाय. तर पनवेलमधील दिलीप देसले यांचाही हल्ल्यात मृत्यू झालाय. तर महाराष्ट्रातले एस बालचंद्रू, सुबोध पाटील, शोबीत पटेल हल्ल्यात जखमी झाले आहेत. दरम्यान, राज्यातील अनेक पर्यटक तिथे पर्यटनासाठी गेले होते. या घटनेनंतर या सर्व पर्यटकांना पुन्हा महाराष्ट्रात यायचटं आहे. या सर्व पर्यटकांना राज्यात आणण्याची व्यवस्था राज्य सरकार करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. दरम्यान, या दहशतवादी *(उर्वरित पान २ वर)*

## दहशतवाद्यांना जशास तसं उत्तर देणार : राजनाथ सिंह

नवी दिल्ली दि. २३ : जम्मू काश्मीरमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे देशभरात एकच खळबळ उडाली असून दहशतवाद्यांना संपवा अशी मागणी केली जात आहे. देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी या दहशतवादी हल्ल्यावर प्रतिक्रिया दिली आहे. धर्माच्या आधारे पर्यटकांची हत्या करणे, निर्दोषांना ठार करणे हे कृत्य निंदनीय आहे. या हल्ल्यातील दहशतवाद्यांना कोणत्याही परिस्थितीत सोडणार नाही, त्यांना जशास तसं उत्तर दिलं जाणार अशा इशारा राजनाथ सिंह यांनी दिला. या हल्ल्यामध्ये सहभागी असलेल्या दहशतवाद्यांसोबतच पडद्यामागे जे कोणी यामध्ये सहभागी असतील त्यांना संपवलं जाईल असंही राजनाथ सिंह म्हणाले.



राजनाथ सिंह म्हणाले की, दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये केलेल्या भ्याड हल्ल्यात आपल्या देशाने अनेक निष्पाप नागरिकांना गमावले. या अत्यंत अमानुष कृत्याने आम्हा सर्वांना दुःख आणि वेदना झाल्या आहेत. सर्वप्रथम ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत त्या सर्व कुटुंबांप्रती मी मनापासून संवेदना व्यक्त करतो. या दु:खाच्या प्रसंगी, दिवंगत आत्म्याच्या शांतीसाठी, मी ईश्वराकडे प्रार्थना करतो.

राजनाथ सिंग पुढे म्हणाले की, आम्ही दहशतवादाविरुद्ध शून्य सहिष्णुता धोरण बाळगतो. या भ्याड कृत्याविरुद्ध भारतातील प्रत्येक नागरिक एकवटला आहे. मी देशवासियांना आश्वासन देतो की, ही घटना लक्षात घेता भारत सरकार आवश्यक आणि योग्य ते सर्व पाऊल उचलेल. ज्यांनी पडद्याआड बसून भारताच्या भूमीवर अशी घृणास्पद कृत्ये करण्याचा कट रचला आहे त्यांच्यापर्यंत आम्ही पोहोचू.

पहलगाममध्ये मृत्यूचं तांडव घडवून आणणाऱ्या त्या चार मानवरुपी *(उर्वरित पान २ वर)*

## आपण एकत्र येऊन, गाझापट्टी बेचिराख करणाऱ्या इस्त्रायलचा भारताला पाठिंबा

नवी दिल्ली दि. २३ : जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण जगाला धक्का बसला आहे. दहशतवादी हल्ल्यात २६ लोकांचा मृत्यू झाला आहे. तर अनेकजण जखमी आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज पहलगामचा दौरा करत परिस्थितीचा आढावा घेतला. तर पंतप्रधान नरेंद्र मोदीही सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून भारतात परतले आहेत. दरम्यान इस्त्रायलने या हल्ल्यावर प्रतिक्रिया दिली असून भारताला पाठिंबा दर्शविला आहे.

भारतातील इस्त्रायलचे राजदूत रुवेन अझर यांनी म्हटले की, हा अतिशय भ्याड हल्ला होता. दहशतवादी नेहमीच लोकांना दहशतीखाली आणण्यासाठी नवे नवे मार्ग शोधत असतात. दहशतवादी कोणत्या पद्धतीने विचार करतात आणि अतिरेकी कृत्य कसे करतात, हे आपल्याला समजून घ्यावे लागेल. या परिस्थितीचा सामना कसा करायचा आहे? हे भारत सरकार नक्कीच ठरवेल.

रुवेन अझर पुढे म्हणाले, मला विश्वास आहे की, आपण या अधिक दृढपणे या परिस्थितीचा सामना करू. भारत सरकार आपल्यापरिने परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न करत आहेच. त्याशिवाय आम्हीही भारताला हरएक प्रकारची मदत करू.

राजदूत *(उर्वरित पान २ वर)*

## एकनाथ शिंदे जम्मू काश्मीरला रवाना घटनास्थळी जाऊन आढावा घेणार

मुंबई दि. २३ : पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मीरमध्ये अडकलेल्या पर्यटकांना परत आणण्यासाठी राज्य सरकारने कंबर कसली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे श्रीनगरसाठी रवाना झाले आहेत. शिंदे हे रात्री ८ वाजता श्रीनगरला पोहोचणार आहेत. काश्मीरमध्ये अडकलेल्या पर्यटकांना परत आणण्याची जबाबदारी एकनाथ शिंदे पार पाडणार आहेत.



पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर राज्यातील अडकलेल्या पर्यटकांना सुखरूप परत आणण्यासाठी शिवसेनेने पुढाकार घेतला आहे. या आधी खासदार श्रीकांत शिंदे आणि त्यांची एक टीम *(उर्वरित पान २ वर)*

## पहलगामनंतर बारामुल्लामध्ये घुसखोरीचा प्रयत्न, २ दहशतवाद्यांचा खात्मा


जम्मू दि. २३ : जम्मू आणि काश्मिरच्या पहलगाममध्ये दहतवाद्यांनी पर्यटकांवर भ्याड हल्ला केला. दहशतवाद्यांनी पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार केला. या गोळीबारामध्ये २८ जणांचा मृत्यू तर अनेक जण जखमी झाले. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर अवघ्या २४ तासांत बारामुल्लामध्ये दहशतवाद्यांनी घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला. या दरम्यान झालेल्या चकमकीत जवानांनी दोन दहशतवाद्यांचा खात्मा केला. सध्या बारामुल्लामध्ये जवानांकडून परिसरात सर्च ऑपरेशन सुरू आहे.

बारामुल्लामध्ये ३ दहशतवाद्यांनी घुसखोरी करणाऱ्या प्रयत्न केला. यामधील दोन दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात जवानांना यश आले आहे. जवानांनी या कारवाईत दहशतवाद्यांचा घुसखोरीचा प्रयत्न यशस्वीरित्या उधळून लावला. चिनार पोलिस-इंडियन आर्मी एक्स हँडलने एका पोस्टमध्ये या कारवाईची माहिती दिली. जवानांनी पहलगाममधील *(पान २ वर)*

### नेव्ही, आयबी अन् वायू दलाच्या अधिकाऱ्यांचा मृत्यू

मुंबई दि. २३ : पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात २७ भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला असून देशभरात संताप व्यक्त होत आहे. दहशतवाद्यांच्या गोळ्यांनी निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागल्याने कुटुंबीयांनी आक्रोश केला आहे. या हल्ल्यात सैन्य दल आणि आयबीमधील अधिकाऱ्यांचाही मृत्यू झाल्याची माहिती समोर आली असून नेव्ही दलातील लेफ्टनंट विनय नरवाल यांना दहतवाद्यांनी भेळपुरी खात *(पान २ वर)*

### माहोल....




मोदीजी यावेळी तुमच्याकडून खूप अपेक्षा आहेत,आशा करतो की तुम्ही त्या पूर्ण कराल...

### तापमान

| | | |
|---|---|---|
| अमरावती | - | ४४.६ |
| अकोला | - | ४५.० |
| बुलढाणा | - | ४०.७ |
| ब्रह्मपुरी | - | ४५.६ |
| चंद्रपूर | - | ४५.५ |
| गडचिरोली | - | ४४.६ |
| गोंदिया | - | ४२.५ |
| नागपूर | - | ४४.४ |
| वर्धा | - | ४४.७ |
| वाशिम | - | ४३.० |
| यवतमाळ | - | ४३.८ |
| भंडारा | - | ४३.० |

GENERAL AIR CONDITIONERS
एअर कंडिशनर्स
संपूर्ण मॉडेल्स उपलब्ध
केडिया
C/o केडिया मॉल, श्रीकृष्णपेठ मो. 9049912413

AC SPECIALIST SHOWROOM
सर्वात मोठी रेंज
58 वर्षांची सेवा
घा फक्त ₹1111/-* व घेऊन जा नामांकित AC
मॉडर्न इलेक्ट्रॉनिक मॉल
रुख्मिणी नगर अमरावती 8600050015

काउच पफ़ी
Corner Sofa ₹29,990/-
Dining Set 4 seater ₹25,000/-
Premium Bedroom Set ₹78,500/-
ड्रीमज़लैंड, नंदा साडी के पास, नागपूर रोड, अमरावती 99300-94691

जे.के.फर्निशींग
● सोफा कापड ● फोम गादी ● सोफा गादी ● पीव्हीसी कार्पेट ● कुशन ● लोड ● पडदे
Sleepwell
जयस्तंभ चौक, अमरावती, मो. ९६८९५०९३३४, ९१४६०९९११६

संपूर्ण लग्न बस्ता
आराधना होलसेल शॉपिंग मॉल
आराधना लाडली बहना उपहार योजना
खरीदारी करें और भाग्यशाली बनें
डेली ड्रॉ | मंथली ड्रॉ | मेगा ड्रॉ
2100/- रु. की साडी फ्री
बम्पर 10 उपहार
फॅशन | ज्वेलरी | चिल्ड्रेन्स वेअर | शूज व सैंडल | होम डेकोर | मॅचिंग
जवाहर रोड, अमरावती. © 2574594
L -2, बिझीलॅन्ड, नांदगावपेठ, अमरावती.

■ www.dainikhindusthan.com ■ फोन : २६६०४२९/२६६६४६४ ■ फॅक्स ०७२१-२६६३३६० ■ इ-मेल : dainikhindusthanpress@gmail.com ■ आर.एन.आय.क्र. ११४२०/५७ ■ पोस्टल रजि.नं. ए.एमटी./आर.एन.पी./८५/२०१८-२०२० ● अमरावती ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● वाशिम